**वाचा**:- १) महाराष्ट्र जमीन महसूल ( महसूली भूमापन व भूमापन क्रमांकाचे उपविभाग ) नियम १९६९.

२) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य) यांचेकडील परिपत्रक क्र. एसव्हीसीआर १०७९. /स २/१९९६, दि. २१/०९/१९९६ व पत्र क्र. एसव्हीसीआर १०७९/ भू - ३/२००३, दि. २४/०३/२००३.

३) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख ((म. राज्य ) यांचेकडील परिपत्रक क्रमांक एल आर ११५३/ भू. ३/२००१, दि. २९/०१/२००२ व क्र. भू. ३/ अभिलेख दुरूस्ती / विनोक्र. ८८/१३ दि.२७/०९/२०१३

४) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म. राज्य ) यांचेकडील परिपत्रक क्र.नाभू.१ / सामीलीकरण / प्र. क्र. / २०१५, दि. १६/०५/२०१५.

---

क्र. भू. ३ / विनोंक्र ३१७ /२०१८
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि
अभिलेख,( म. राज्य ) पुणे यांचे कार्यालय
पुणे, दिनांक २६/०२/२०१८

**विषय :- मंजुर अभिन्यासाप्रमाणे भूमि अभिलेखामध्ये दुरूस्ती करताना करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

परिपत्रक

नगर रचना विभागाकडुन अभिन्यास तातपुरत्या स्वरूपात मंजुर केल्यानंतर बिगरशेती आदेशाप्रमाणे भूमि अभिलेख विभागाकडुन अर्जदार यांचे अर्जानुसार जागेवरील सिमांकनानुसार मोजणीची कार्यवाही केली जाते. त्यानंतर नगर रचना विभागाकडुन अभिन्यासास अंतिम मंजुरी देण्यात येते. नगर रचना विभागाने दिलेल्या अंतिम मंजुरी नुसार भूमि अभिलेख विभागाकडून कमी जास्त पत्रक तयार करताना सर्व्हे नंबर / गट नंबर / हिस्सा नंबर नमुद करण्याबाबत एकवाक्यता नसल्यामुळे भूमि अभिलेख व ७/१२ संगणकीकरणामध्ये विविध अडचणी निर्माण होत आहेत. त्या अनुषंगाने कमी जास्त पत्रक तयार करताना करावयाच्या कार्यवाहीबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. सक्षम प्राधिकारी यांचेकडुन ब-याच वेळा अनेक सर्व्हे नंबर/ गट नंबर/ हिस्सा नंबर चे एकत्रीकरण करून अभिन्यास मंजुर केला जातो. अशा वेळी विभागातील कार्यालयाकडून सर्व्हे नंबर / गट नंबर / हिस्सा नंबर नमुद करून त्यानंतर प्लॉट नंबर नमुद केले जातात. उदा. गट नं. २+३+४/५ + ४/ ६ चा प्लॉट नं. १ ते ५० असे नमुद करून कमी जास्त पत्रक तयार केले जातात. याप्रमाणे नवीन नंबर देण्यात आल्यास त्याचा अंमल संगणकीकृत ७/१२ मध्ये घेता येत नाही. कारण संगणकीकृत ७/१२ मध्ये + (अधिक) चिन्ह नमुद करून भूमापन क्रमांक नमुद करण्याची सुविधा उपलब्ध नाही.

महाराष्ट्र जमीन महसूल ( महसूली भूमापन व भूमापन क्रमांकाचे उपविभाग ) नियम १९६९ मधील नियम ११ (३) नुसार भूमापन क्रमांकाचे एकत्रीकरण बाबतची कार्यपद्धती ठरवुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार सर्व्हे नंबर / गट नंबर / हिस्सा नंबर चे एकत्रीकरण करतेवेळी एकत्रीकरणाच्या क्रमांकाच्या मालिकेतील पहिला क्रमांक द्यावयाचा आहे. त्यामुळे यापुढे कमी जास्त पत्रक तयार करतेवेळी उपरोक्त नमुद केलेप्रमाणे अनेक सर्व्हे नंबर / गट नंबर / हिस्सा नंबर चे एकत्रीकरण होत असल्यास त्या सर्व्हे नंबर /

Scanned by CamScanner

गट नंबर / हिस्सा नंबर मधील पहिला क्रमांक देऊन त्यामध्ये मंजुर रेखांकनानुसार भूखंडाचे क्रमांक दर्शवावे. उदा. गट नं. २, भूखंड क्रमांक १ ते ५०.

२. त्याचप्रमाणे मंजुर अभिन्यासाप्रमाणे असणारे रस्ते, खुल्या जागा व सुविधा क्षेत्र यास देखील भूखंड क्रमांक देऊन त्यापुढे कमी जास्त पत्रक रकाना क्र. १६ मध्ये मंजुर अभिन्यासामधील रस्ता / खुली जागा / सुविधा क्षेत्र असे स्पष्टपणे नमुद करावे. म्हणजे त्याप्रमाणे योग्य नोंदी संगणकीकृत ७/१२ मध्ये घेता येतील.

३. ७/१२ संगणकीकरणामध्ये सर्व बिनशेती क्षेत्रासाठी आर. चौ. मी. हे एकक निश्चित करण्यात आलेले आहे. त्यामुळे मंजुर रेखांकन / बिनशेती आदेश कोणत्याही एककामध्ये असला तरी कमी जास्त पत्रक तयार करताना भूखंडाचे क्षेत्र आर. चौ. मी. मध्ये रुपांतरित करुन नमुद करण्यात यावे. उदा. ५१५.५० चौ. मी. क्षेत्र असल्यास ते ५.१५.५० आर चौ.मी. असे नमुद करावे. म्हणजे त्याचा योग्यरित्या अंमल संगणकीकृत आज्ञावलीमध्ये घेता येईल.

राज्यामध्ये ७/१२ संगणकीकरणाचे काम अंतीम टप्यात असुन यापूर्वी मंजुर केलेल्या कमी जास्त पत्रकाचा अंमल घेण्यात काही तांत्रिक अडचण आल्यास संबंधित तहसिलदार यांचेकडून आवश्यक ती कागदपत्रे व प्रस्ताव प्राप्त करुन घेऊन नियमानुसार दुरुस्त कमी जास्त पत्रक तयार करुन गावी अंमल घेण्यासाठी पाठवावे.त्याचप्रमाणे यापुढे कमी जास्त पत्रक तयार करताना उपरोक्त सूचनांचा काटेकोरपणे विचार करावा. जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख / उप संचालक भूमि अभिलेख यांनी त्यांचे दौ-याचेवेळी उपरोक्तप्रमाणे कार्यवाही होत असल्याची खात्री करावी.

(एस. चोक्कलिंगम्)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख,(म.राज्य) पुणे

O/c

प्रत :- मा.प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
प्रत :- मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई – ३२.
प्रत :- सर्व विभागीय आयुक्त.
प्रत :- संचालक नगर रचना महाराष्ट्र राज्य.
प्रत :- सर्व जिल्हाधिकारी.
प्रत :- सर्व आयुक्त, महानगर पालिका ( नगर रचना विभाग ) मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपरिषद (नगर रचना विभाग)
प्रत :- सर्व उपसंचालक भूमि अभिलेख.
प्रत :- सर्व जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख.

२/- आपल्या जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, उप अधीक्षक भूमि अभिलेख / नगर भूमापन अधिकारी तसेच महानगरपालिका/नगरपालिका /नगरपरिषद (नगर रचना विभाग) या सर्व कार्यालयांना सदर परिपत्रकाची प्रत पुरविण्यात यावी.

प्रत :- सर्व उपविभागीय अधिकारी
प्रत :- सर्व तहसिलदार

27 FEB 2018

Scanned by CamScanner